# प्रकरण चौथे

# बार्शी नगरपालिकेने पाणी पुरवठा व दुष्काळ निवारणासाठी केलेले प्रयत्न

# प्रकरण चौथे
# बार्शी नगरपालिकेने पाणीपुरवठा व दुष्काळ निवारणासाठी केलेले प्रयत्न

पाण्यासाठी पहिले पाऊल.

विविध पाणीपुरवठा योजना.

१. चांदणी प्रकल्प

२. पाथरी पाणीपुरवठा योजना

३. शहरातील विहीरी

४. विंधण विहीरी

ओव्हर ऑल सिटी डिस्ट्रीब्युशन स्कीम.

अभिवर्धन योजना.

के. व्ही विद्युत उपकेंद्र.

बार्शी कुर्डूवाडी शहरासाठी संयुक्त पाणीपुरवठा योजना - १९९०

नकाशा क्र. - ३

# प्रकरण चौथे
# बार्शी नगरपालिकेने पाणीपुरवठा व दुष्काळ निवारणासाठी केलेले प्रयत्न


**पाण्यासाठी पहिले पाऊल :**

सन १८९१ मध्ये बार्शी शहराची लोकसंख्या २०, ०८४ एवढी होती. गावातील विहिरीच्या पाण्यावरच सर्वांचे जीवन अवलंबून होते. शहराच्या उत्तर बाजूस जयशंकर मिलसमोर जे टँक आहे. त्याच्या पाण्यामुळें गावातील विहिरींना पाणी रहात असे एखाद्या वर्षी अवर्षण ( दुष्काळ ) पडले तर सर्व विहीरी कोरड्या पडत. त्यावेळी लोकांचे पाण्यासाठी अतिशय हाल होत असत.

सन १९१२ - १३ च्या अहवालानुसार बार्शी शहर व परिसरामध्ये १८९५ साली फारच मोठा दुष्काळ पडला होता. सन १९१२ पर्यंतच्या १६ वर्षात बार्शीत जवळजवळ ११ वेळा दुष्काळ पडला होता. या दुष्काळमध्ये गावातील कोणत्याच विहिरींना पाणी नव्हते. त्याचप्रमाणे म्युनिसिपालीटीचा जयशंकर मिलसमोरील टँकसुध्दा कोरडा पडला होता. पोस्ट ऑफिसपासुन दीड मैलावर 'गोरोढा' नाला आहे. तेथे फक्त या दुष्काळमध्ये पाणी राहीलेले होते. " गव्हर्नमेंट सॅनिटरी इंजिनिअर्सच्या " सल्ल्याने या गोरोढ्यामध्ये म्युनिसिपालीटीने एक विहीर खणून तेथून पोस्ट ऑफिसपर्यंत ' ४ इंची ' पाईपलाईन टाकली. व हा भाग ४५ फुट उंचीवर असल्यामुळे आईलइंजिन व पंप बसवून या पाईपलाईनने पोस्ट ऑफिसपर्यंत पाणी आणण्यात आले. याकामी म्युनिसिपालीटीने १३,००० रु. खर्च केले. " फर्मान मेझर" म्हणून या स्कीमला सरकारने मंजुरी दिली. व या विहिरीपासुन रोज ६०,००० गॅलन पाणी मिळेल अशी अपेक्षा होती पण सतत दोन वर्षे दुष्काळ पडल्याने २० ते २५ हजार गॅलनच पाणी या योजनेमुळे मिळत असे. अशारितीने ही स्कीम यशस्वी झाली नाही. पाथरी तलावाचे पाणीही यावेळी बाष्पीभवनामुळे बरेच घटले होते.

पुढे १९०८ मध्ये गव्हर्नमेंट सॅनिटरी इंजिनिअर्सच्या सुचनेप्रमाणे म्युनिसिपालीटी टँकची कॅचमेंट एरिया वाढविण्याकरीता कॉटूर लेव्हल्सनी एक 'फीडर कॅनॉल ' त्या टँकला जोडण्यात आला. याकामी म्युनिसिपालीटीकडुन ३,८६१ रुपये खर्च केला व अशारितीने म्युनिसिपालीटी टँकचा पुरवठा बराच वाढविण्यात आला व सन १९१२ मध्ये दुष्काळी योजना म्हणून गोरोढीपासुन पाईपलाईन टाकण्याचा प्रयोग वरीलप्रमाणे करण्यात आला.

१९१४ मध्ये शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टिने शहरास कायमपणे पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टिने बार्शीपासुन अवघ्या १२ मैलावर असणाऱ्या पाथरी तलावातील पाणी शेतीबरोबरच बार्शी शहरास द्यावे लागेल असा ठराव म्युनिसीपालीटीमध्ये मांडण्यात आला. पाथरी तलाव बार्शी शहरापेक्षा उंचावर असल्याने त्यामधील पाणि ग्रॅव्हिटेशनने बार्शी शहरापर्यंत येणे सहजरित्या शक्यही होते. यासंदर्भात बार्शी शहराचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष निष्णात कायदेपंडित कै. रामचंद्र मोरेश्वर साने यांनी १९१४ मध्ये पाथरी पाणीपुरवठा योजना हाती घेण्याबद्दल सरकारशी पत्रव्यवहार सुरु केला. या प्रयत्नास यश येऊन पाथरी तलावापासुन '१० इंची' कास्ट आयर्न पाईपलाईन टाकून पाथरी तलावातील पाणी ग्रॅव्हिटेशनने बार्शी येथील रिझर्व्हायरमध्ये सोडण्याची योजना सरकारच्या इंजिनियरमार्फत करण्याचे ठरले. यासाठी ४,३६,००० रुपये एवढा खर्च अपेक्षित होता. नगरपालिकेजवळ इतका पैसा एकदम असणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे एवढे कर्ज काढण्याचीही परिस्थिती नगरपालिकेची नव्हती. तेव्हा असे ठरविण्यात आले की सरकारने या योजनेकरता निम्मी रक्कम (५०%) अनुदान म्हणून दयावी व निम्मी रक्कम (५०%) कर्ज म्हणून नगरपालिकेस दयावी. या ठरावाप्रमाणे नगरपालिकेस अनुदानाची रक्कम रुपये २,३८,०८७ रु. सन १९१४-१५ मध्ये सरकारकडून मिळाली. व कर्जाची रक्कमही सन १९१६-१७ व १९१७-१८ सालात मिळाली. परंतु याचवेळी पहिले महायुध्द सुरु होते. त्यामुळे लोखंडाच्या किंमती वाढल्यामुळे या




बार्शी पाणी पुरवठा जलकुंभ

योजनेचे मूळचे इस्टिमेट रिव्हाईज करावे लागले. यानुसार रिव्हाईज इस्टिमेट रुपये ४, ७३, ०८७ इतके करण्यात आले. व मूळ इस्टिमेटपेक्षा ५०, ००० रुपये जास्त मागणी सरकारकडे मे. जनरल बोर्ड ठराव नं. - १५० तारीख २८/३/१९१९ प्रमाणे करण्यात आली. व सरकारनेही जादा मागणी मान्य करुन नगरपालिकेस अनुदानाचे व कर्जाचे पैसे दिले. अशारितीने पाथरी पाणीपुरवठा योजना सन - १९१८ च्या अखेरीस जवळजवळ पूर्ण होऊन बार्शी शहरास मुबलक पाणी मिळू लागले.

## विविध पाणी पुरवठा योजना

### शहरामध्ये पाणी - पुरवठ्याचे मुख्य माध्यम खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चांदणी तलाव | दररोज | ५०,००,००० लि. |
| २. | पाथरी तलाव | दररोज | १५,००,००० लि. |
| ३. | शहरातील विहिरी | दररोज | १०,००,००० लि. |
| ४. | विंधण विहिरी | दररोज | १,००,०० लि. |

**१. चांदणी प्रकल्प :**

सन १९७२ - ७३ मध्ये पडलेला अवर्षणयुक्त दुष्काळ व त्यातुन निर्माण झालेली पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी शासनाने तातडीची पाणीपुरवठा योजना हाती घेऊन चांदणी प्रकल्प पूर्ण केला या प्रकल्पाचे स्वरुप व सर्व आकडेवारीसहीत माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

परांडा तालुक्यातील चांदणी नदीवर धरण बांधुन मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी चांदणी तलाव निर्माण करण्यात आलेला आहे. या तलावाची पाण्याची एकूण साठवण क्षमता ७३१ दक्षलक्ष घनफूट असून यापैकी इरिगेशनकरीता वापरण्याजोगे पाणी ५७० दशलक्षा घनफूट असून डेड स्टोरेज ३. २८ दशलक्ष घनफूट आहे. या चांदणी तलावातून बार्शी शहरासाठी पाणी पुरवठा घेणेसाठी तातडीची पाणी - पुरवठा योजना शासनाने तयार केली. ही योजना ३७, १०, ००० रु. खर्चाची होती. या योजनेमध्ये चांदणी

धरणाजवळ 'जॅक वेल पंप ' हाऊस व तेथे १२० अश्वशक्तीच्या दोन इलेक्ट्रीक मोटर्स बसवून अशुध्द पाणी १२ इंच पाईपलाईनव्दारे बार्शी येथे परांडा रस्त्यावरील पाणी - पुरवठा केंद्रामध्ये आणून तेथे या पाण्यावर तुरटी व ब्लिचिंग पावडरची प्रक्रिया करुन ते शुध्द व निर्जंतूक करुन नगरपालिकेच्या टाक्यांमध्ये पंपींगव्दारे पाठविले जाते. या योजनेतून सुरवातीच्या काळात (सन १९७३) दररोज ४० ते ५० लक्ष लिटर्स पाणी पुरवठा उपलब्ध होत असे. या योजनेमध्ये बार्शी येथील पाणी पुरवठा केंद्रामध्ये फिल्ट्रेशन प्लँट जुलै १९८५ मध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे. तेव्हापासुन संपूर्ण बार्शी शहरास फिल्टर्ड पाणी मिळत आहे.

२. **पाथरी पाणीपुरवठा योजना :**

बार्शी पासुन उत्तरेस सुमारे १८ किलोमिटर अंतरावर हा इरिगेशन तलाव आहे. या तलावापासुन बार्शी शहरापर्यंत अर्धचंद्राकृती रेषेत १० '' बिडाची पाईपलाईन घालण्यात आलेली आहे. पाथरी तलावाचे पाणी घेण्यास १९४० मध्ये सुरवात करण्यात आली आहे. तलावाकडून पाणी उताराने बार्शी शहराकडे येते. दररोज सुमारे १५ दशलक्ष पाणी पुरवठा या माध्यमातून मिळतो. तलावाकडून येणारे अशुध्द पाणी प्रथम ३ लक्ष लिटर्स क्षमतेच्या सेटलिंग टँकमध्ये येते. तेथे या पाण्यावर तुरटी व ब्लिचिंग पावडरच्या प्रक्रिया करुन पाणी स्वच्छ व निर्जंतुक केले जाते. तेथून पाणी लगतच्या जमिनीवरील हौदामध्ये जमा केले जाते. हा जमिनीवरी हौद सन १९४० मध्ये बांधण्यात आला असून याची क्षमता ७ दशलक्ष गॅलन आहे. या हौदातून पाणी शहरामध्ये पाईपलाईनव्दारे वितरीत केले जाते.

पाथरी तलावाकडून येणारे पाणी फिल्टर करणेची यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. सध्या फक्त तुरटी टाकून पाणी स्वच्छ केले जाते. परंतु पावसाळ्यात व उन्हाळ्यात गाळयुक्त पाणी येते. यासाठी पाथरी पाण्यासाठी फिल्ट्रेशन प्लॅन्ट नगरपालिका पाणी - पुरवठा केंद्राच्या आवारात शासनाने उभा केलेला आहे. यासाठी ९,१०,०००

रुपये शासनाने खर्च केला असून निर्धारित आर्थिक आकृतीबंधानुसार शेकडा १० टक्के रक्कम स्वत: नगरपालिकेने लोकवर्गणीतून शासनाकडे भरलेली आहे.

### ३. शहरातील विहीरी :

बार्शी शहरास खालील विहीरीच्या माध्यमातून दैनिक पाणी पुरवठा केला जातो. त्यांचा क्रमवार तपशील व माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अंबराई नाला विहीर | : | ४० एच. पी. मोटर व ३० एच पी इंजिन |
| २. | घोडेगल्ली विहीर | : | २५ एच. पी. मोटर |
| ३. | येडाई विहीर | : | २५ एच. पी. पंपसेट |
| ४. | कोर्ट विहीर | : | २५ एच.पी . पंपसेट |
| ५. | संकेश्वर विहीर | : | २५ एच. पी. पंपसेट |
| ६. | नारायण बाग विहीर | : | ५ एच. पी. पंपसेट |
| ७. | उत्रेश्वर विहीर | : | ५ एच. पी. पंपसेट |
| ८. | लक्ष्मीतीर्थ विहीर | : | १० एच. पी. पंपसेट |

याशिवाय जवाहर हॉस्पीटल विहीर व दत्त गायन विहीर येथून पाण्याचे टँकर्स भरुन देणेची व्यवस्था केलेली आहे. तसेच पत्की झरा विहिर व बेदराई विहीर याठिकाणी पाण्याची कारंजे बसविली असून विद्युत रोषणाई कारंजे चालु आहेत.

### ४. विंधण विहीरी :

शहरात वेळोवेळी गरजेनुसार आवशक त्याठिकाणी विंधन विहीरी घेतल्यामुळे त्यांची संख्या सुमारे २४५ इतकी झाली आहे. त्यांची यादी खालीलप्रमाणे

४. इंच " विंधण विहीरी : १४२

६ इच " विंधण विहीरी : १०३

यापैकी सर्वच विंधन विहीरीवर ७.५ अश्वशक्तीचे इलेक्ट्रिक सबमर्सिबल पंपसेट बसविण्यात आले असून आसपासचे नागरिकांना सार्वजनिक तोट्यांव्दारे पाणी उपलब्ध

करुन दिले आहे. उपरोक्त संख्येमध्ये शासनाकडून 'तातडीची योजना'म्हणून खोदलेल्या ७५ विंधण विहीरींचाही समावेश आहे. याशिवाय सन १९९० - ९१ मध्ये अणखी नवीन १०० विंधण विहीरी बार्शी शहरात खोदून त्यावर हँडपंप बसविण्यात आले आहेत. यासाठी सुमारे ३०,००,००० रुपयांची योजना राबविण्यात आलेली आहे. सध्या विंधण विहीरीपासुन सुमारे ५०,००,००० लिटर पाणी उपलब्ध होते.

**ओव्हर ऑल सिटी डिस्ट्रीब्युशन स्कीम :**

शहराचा पाणी पुरवठा सर्व प्रभागातून सारखा व्हावा यासाठी शहराची पाईप लाईन बदलण्यासाठी ओव्हर ऑल सिटी डिस्ट्रीब्युशन स्कीम तयार करण्यात आली होती. या योजनेसंदर्भात माहिती व तपशील खालीलप्रमाणे सांगता येईल.

शहरातील पाईप लाईन्स जुनी व जीर्ण झाल्यामुळे ती बदलणे व शहराची संभाव्य लोकसंख्यावाढ विचारात घेऊन दैनंदिन पाणी पुरवठा करण्यासाठी पूर्णता नवीन व मोठ्या व्यासाची पाईपलाईन घालणे गरजेचे झाले. त्यादृष्टिने शहरातील पाईपलाईन बदलण्याच्या कामासाठी १.१५ कोटी रुपये खर्चाची योजना शासनाने तयार केली. ही योजना एकदम राबविणे. अर्थिकदृष्टया शक्य नसल्यामुळे योजना तीन टप्प्यामध्ये राबविण्यात आली.

**टप्पा - १ :**

पहिल्या टप्प्यामध्ये प्रामुख्याने शहराचे गावठाण व बाजारपेठ या भागातील पाईपलाईन बदलण्यासाठी शासनाने ६६, ७२, १०० रुपये खर्चाची तरतुद केली. या पहिल्या टप्प्याची आंमलबजावणी १९७९ - ८० या वर्षामध्ये करण्यात आली.

**टप्पा - २ :**

दुसऱ्या टप्प्यामध्ये सुभाषनगर , शिवजीनगर या भागातील पाईपलाईन बदलण्याचे काम करण्यात आले. या कामासाठी शासनाने २५, १४, ६०० रुपये खर्च केला. या टप्प्याची आंमलबजावणी सन १९८२ मध्ये परिसर अभियंत्रिकी विभागामार्फत करण्यात आली.

**टप्पा : ३ :**

तिसऱ्या व शेवटच्या टप्प्यामध्ये सुभाषनगर व बाजारपेठ या शहराच्या भागामध्ये पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने सुभाषनगर हौदाजवळ १४ दशलक्ष लिटर्स्‌ची उंची आर .सी.सी. टाकीचे बांधकाम इ. एन. ई. विभागामार्फत पूर्ण केले. ही टाकी बांधण्यासाठी ३०. १२ लक्ष रुपये नगरपालिकेने स्वत: खर्च केले.

## "अभिवर्धन योजना" :

चांदणी तलावापासुन उपलब्ध होणारे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी व पाथरीहून उपलब्ध होणारे पाणी शेवाळमिश्रीत आसल्याने निर्माण होणारी पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी शासनाने १९८६-८७ मध्ये अभिवर्धन योजनेसाठी ६७.१८ लाख रुपये मंजूर केले. या योजनेचे काम १९८८ अखेर पूर्ण झाले. अभिवर्धन योजनेमध्ये प्रामुख्याने दोन महत्त्वाची कामे पूर्ण करण्यात आली.

पाथरी तलाव गाळाने भरत आला असल्यामुळे १९८६ मध्ये या तळ्यातून येणारे पाणी अतिशय गाळयुक्त व दुर्गंधीयुक्त येऊ लागले. त्यामुळे या तळ्याचे पाणी लोकांनी पिण्यासाठी बंद केले. परिणामी दररोज १५ लक्ष लिटर्सची पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी शासनाने बार्शी शहरासाठी तातडीची पाणीपुरवठा योजना म्हणून खालील दोन योजना मंजुर केल्या .

| | | |
|---|---|---|
| १. | चांदणी पाणी पुरवठा अभिवर्धन ( बुस्टर ) योजना | ४२,३३,५०० |
| २. | शहरामध्ये विंधण विहीरी ( ६ इंच ) खोदून त्यावर - हॅंन्डपंप बसविणे . | २४,८४,५०० |
| | एकूण रुपये | ६७,१८,००० |

या योजनेचा खर्च शासन ९० % तर नगरपालिकेने लोकवर्गणीतून १० % केला.

**१. चांदणी पाणी पुरवठा अभिवर्धन ( बूस्टर ) योजना :**

चांदणी धरणाजवळील जॅक वेलवर पूर्वी १२५ अश्वशक्तीच्या मोटर्स बसविल्या होत्या. त्याद्वारे दर ताशी २,२७,७०० लिटर्स पाणी बार्शी शहराकडे येत असे. त्याऐवजी सदर ठिकाणी २२० अश्वशक्तीच्या मोटर्स बसवून दर ताशी ३, ४५, ००० लिटर्स पाणी शहराकडे आणणेची योजना हाती घेण्यात आली. तसेच चांदणी धरण ते बार्शी दरम्यान धरणापासुन ६.५ किलोमीटर अंतरावर एक नवीन पाण्याचा हौद ५,००,००० लीटर्सच्या क्षमतेचा बांधून चांदणी धरणाकडून येणारे पाणी या हौदास घेऊन पुन्हा ते २२० अश्वशक्तीचे पंपसेटद्वारे बार्शी शहराकडे पंपींगव्दारे पाठविण्यात येऊ लागले. या योजनेची कार्यवाही मे १९८८ मध्ये पूर्ण होऊन दिनांक १३ / ५/ १९८८ पासुन बूस्टरव्दारे वाढीव पाणीपुरवठा दररोज सुमारे ६५ ,००लिटर्स मिळू लागला.

**२. शहरामध्ये ७५ विंधन विहीरी (६ इंच) खोदून त्यावर हॅन्डपंप बसविणे :**

तातडीची योजना म्हणून या योजनेचे कामही शासनाचे परिसर अभियांत्रिकी विभागामार्फत हाती घेऊन सन १९८४ मध्ये पूर्ण करण्यात आले. या योजनेमध्ये ६ नवीन विंधन विहीरीवर ७.५ अश्वशक्तीचे इलेक्ट्रीक सबमर्सिबल पंपसेट बसविण्यात आले. याचा पूर्ण तपशील पुढीलप्रमाणे -

सन १९६८ मध्ये शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची टंचाई निर्माण झाली. त्यासाठी युध्दपातळीवर शहरातील जुन्या व बुजविण्यात आलेल्या विहीरी पुन्हा उपयोगात आणण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरु करुन शहरातील पाणी पुरवठा सुरळीत केला. १९७२ च्या दुष्काळामध्ये पाणी पुरवठा विहीरींचा व गावतळ्यांचा गाळ काढण्याच्या कामास जिल्हाधिकारी श्री. बटव्याळ ( शासनाने ) मान्यता दिली. त्यावेळी प्रशासक म्हणून श्री. डी. एन. वैद्य होते. हे काम दुष्काळी काम म्हणून हाती घेण्यात आले . या कामावर सुमारे ६ ते ७ लाख रुपये खर्च शासनामार्फत करण्यात आले. याचवेळी पाथरी तलावातून होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील पाणी हे दुषीत असल्याचे वृत्त वर्तमानपत्रातुन

प्रसिध्द झाले. नागरिकांनी नगरपालिका कार्यालयासमोर उपोषणही केले. त्यावर विचार व उपाययोजना करण्यासाठी नगरपालिकेने कृती समिती स्थापण केली. पाण्याचे नमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासण्यात आले. तपासणीअंती वर्तमानपत्रातील बातमीमध्ये तथ्य असल्याचे जाणवले. दरम्यान तत्कालीन आमदार सौ. शितोळे यांनी बार्शी शहराच्या पाणी - पुरवठ्याचा प्रश्न विधानसभेत लावून धरला. त्यामुळे तेंव्हाचे पाटबंधारे मंत्री मा. वसंतदादा पाटील यांनी विधानसभेत बार्शी व जळगाव येथील पाणी पुरवठा राज्यशासनाने १०० टक्के करावा असा निर्णय घेतला. यातूनच बार्शी शहरासाठी तातडीची पाणीपुरवठा योजना म्हणून ' चांदणी प्रकल्प ' हाती घेतला. या प्रकल्पावर ३७. १० लाख रुपये एवढा खर्च करण्यात आला. अवघ्या ६ महिन्यातच सदरचा पाणी पुरवठा स्थिरीकरण व निर्जंतुकीकरण करुन सुरु करण्यात आला. याचवेळी पाथरी प्रकल्पातून होणारा पाणी पुरवठाही निर्जंतुक करुन घेण्यात आला. दरम्यानच्या काळात नगरपालिका कायद्यातील दुरुस्तीनुसार नगराध्यक्षा म्हणून श्रीमती प्रभावती झाडबुके निवडून आल्या. शिवाजीनगर व मार्केट यार्डासमोर उंच टाक्या उभारुन व सुभाषनगर पाणी पुरवठा केंद्रात १२ इंच पाईप लाईन टाकुन पाणी पुरवठा सुरु केला. या योजनेतील दुसरा टप्पा जलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम करुन राबविण्यात आला. याची आंमलबजावणी सन १९८५ मध्ये सुरु केली. याचवेळी परांडा रस्त्यावर १४ लाख लीटर्स क्षमतेची उंच टाकी १९८३ मध्ये उभारण्यात आली. त्याचप्रमाणे कंदलगाव रस्त्यावर १९७६ - ७७ मध्ये जलशुध्दीकरण केंद्रही उभारण्यात आले.

दुसऱ्या टप्प्यानंतर शहरातील विविध भागात जेथे पाणी पुरवठा उपलब्ध नाही किंवा अपुरा होतो अशाठिकाणी नगरपालिकेने स्वत:च्या निधीतून प्रशासक श्री. कोरडे यांच्या कारकीर्दीत २२ विंधन विहीरी पाडण्यात आल्या . यानंतरसुध्दा पाणी टंचाई जाणवू लागल्याने प्रशासक श्री. जी. जी. कुलकर्णी यांच्या काळात काही विंधन विहीरी घेतल्या. आतार्पंत पाणी - पुरवठा विभाग हा स्थापत्य विभागाअंतर्गत होता तो सन

१९८४ पासुन स्वतंत्र पाणी - पुरवठा विभाग म्हणून कार्यान्वीत झाला. "महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम - १९६५" च्या कलम - ७५ ( २ ) चा विचार करुन स्वतंत्ररित्या पाणी पुरवठा अभियंता यांच्या अखत्यारित स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला. याचदरम्यान "महाराष्ट्र नगरपालिका आधिनियम - १९६५" कलम - ४ ( अ ) नुसार प्रशासकांच्या अखत्यारित असलेल्या निवडणूका घेऊन लोकनियुक्त मंडळ अधिकार रुढ झाले (१९८५).

बार्शी शहराबाहेरील नवविकसीत व अनधिकृत नागरी वसाहतीमधील पाण्याचा भीषण प्रश्न अजून सुटलेला नव्हता . म्हणून नगरपालिकेने स्वत:च्या निधीतून ४० विंधन विहीरी घेतल्या . याचकाळात विधानसभेमध्ये आमदार दिलीप सोपल व इतर आमदारांनी दूषीत पाणी प्रश्न लक्षवेधी सुचनेव्दारे उपस्थित केला. यावेळी पुण्याचे आरोग्य सेवा संचालक डॉ. मिश्रा. बार्शीला समक्ष येऊन दूर्षीत पाणी परिस्थितीची पहाणी करुन गेले व त्यांनी पाथरी तलावातून होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करण्याच्या तोंडी सुचना दिल्या . याचवेळी नगरपालिकेत कलम - ८१ (४) खाली श्री. मठपती यांनी प्रस्ताव देऊन चर्चा घडवून आणली. व महाराष्ट्र शासनाने याकामी तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर करावी असा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात आला. व नगरपालिकेने लोकवर्गणी भरण्याचा मनोदयही व्यक्त केला. नगरविकास मंत्री व महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाचे अध्यक्ष श्री. सुब्रम्हण्यम यांच्याशी बार्शी नगरपालिका , आमदार व नगरिकांच्या वतीने शहरात स्थापण झालेल्या. कृती समितीचे शिष्टमंडळ भेटले आणि प्रश्नाची निकड लक्षात आणून दिली. डॉ. सुब्रम्हण्यम यांनी याबाबतीत योजना तयार करण्याचे आदेश दिले. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर गायकवाड व आयुक्त के. एस. सिंधू यांनी तातडीची पाणीपुरवठा योजना तयार करणे गरजेचे आहे. असा अहवाल सरकारकडे पाठविला. या अहवालानुसार चांदणी मूळ योजनेत समाविष्ट असलेली अभिवर्धन योजना ( बूस्टर )

राबविण्याची विनंती केली. या योजनेच्या भूमीपूजनास विधानसभेचे उपसभापती व ग्रामीण राज्यमंत्री बाळासाहेब जाधव हजर होते.

बार्शी नगरपालिका " ब " वर्गात असल्याने तत्कालीन नगरविकासमंत्री मा. विलास सावंत यांना नगराध्यक्षा श्रीमती प्रभावती झाडबुके , आमदार दिलीपराव सोपल व नगरसेवकांचे शिष्टमंडळ भेटले. याचवेळी त्यांनी विंधन विहीरी - ७५ व अभिवर्धन योजना ही संयुक्त योजना ( ६७. १८ लाख ) मंजूर करण्याची विनंती केली. आणि सदर दिवशीच शासन निर्णय क्र. SGC/1086/3008/CS/465/3/86/UD-16 दिनांक १४/१/१९८७ अन्वये जाहीर करण्याल आला. या निर्णयानुसार नगरपालिकेने आपली १० टक्के लोकवर्गणी प्रस्ताव क्रमांक १९६ दिनांक ९/१/८७ नुसार भरलेली होती. तात्काळ या योजनेतील पहिल्या टप्प्यातील ७५ विंधन विहीरी एका महिन्यात पूर्ण करण्यात आल्या व अभिवर्धन योजना ६ ते ७ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात आली.

दरम्यानच्या काळात बार्शी शहराचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी उजनी जलाशयातून बार्शी शहरास पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी कृती समितीमार्फत करण्यात आली. या मागणीस बार्शी नगरपालिकेने पाठिंबा देऊन राज्य शासनाने याबाबत निर्णय घ्यावा असा प्रस्ताव संमत केला . याबाबत पाहणी करण्यासाठी मा.नगराध्यक्षा , त्यांचे सहकारी , आमदार , कृती समितीचे सहकारी पदाधिकारी , पाणी पुरवठा मंडळाचे अधिकारी यांनी जागेची पाहणी करुन कंधार या गावापासुन कुर्डूवाडी व बार्शी शहराला पाणी पुरवठा करणारी स्कीम आखली. या काळात गणेशोत्सव मंडळाच्या निमित्ताने " बार्शीची मागणी उजणीचे पाणी " असा जगजागरणाचा कार्यक्रम सुरु करण्यात आला. पत्रकारांनीसुध्दा याचा पाठपुरावा बार्शीपासुन शासनपातळीपर्यंत केला. याचकाळात याबाबत नगरपालिकेने वेळोवेळी राज्य शासनाकडे अंदाजपत्रक पाठवून पाठपुरावा केला. याबाबत शासनाच्या सर्व अटी आम्हाला मान्य

आहेत असा ठरावही नगरपालिकेने शासनाकडे पाठविला. या प्रश्नावर आमदार दिलीप सोपल यांनी विधानसभेत तारांकीत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाची चर्चा विधानसभेत दिनांक १५ / ७ / ८७ रोजी झाली आणि मुख्यमंत्री मा. नामदार शरद पवार व नगरविकास मंत्री डॉ. जामखानावाला यांच्या उपस्थितीत ''बार्शी -कुर्डूवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना '' २ महिन्याच्या आत आंमलात आणली जाईल अशाप्रकारे उत्तर दिले. या आश्वासनानुसार बॅ. बी. अे. देसाई यांनी संबंधीत अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन कारवाई करण्याच्या सुचना दिल्या . नियोजन व अर्थ खात्यानेही या योजनेला हिरवा कंदील दाखविला. अर्थ खात्याने काही तांत्रीक मुद्दे उपस्थित केल्याने हे प्रकरण थोडेसे रेंगाळले व शंकेचे निरसन झाल्यानंतर संबंधीत संयुक्त पाणी - पुरवठा योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला. याप्रमाणे नगरपालिकेने निर्धारित धोरणानुसार प्रस्ताव क्रमांक २५६ दि. २७/१०/८९ नुसार लोकवर्गणीचा १ ला टप्पा म्हणून रुपये २५ लाखाचा चेक दिला व मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुचीत केल्याप्रमाणे प्रस्ताव क्र. २९५ दि. २६ /२/८९ रोजी ३.५७५ लाख रुपयाची रक्कम भरली.

असे असले तरी बार्शी नगरपालिकेने सुभाषनगर व शहरातील ग्रामदैवत भगवंत देवळापर्यंतचा भाग यांना दाबाने पाणी पुरवठा होत नाही. म्हणून ३ ऱ्या टप्प्यातील उंच पाण्याची टाकी १४ लाख लीटरची तात्काळ मंडळाने हाती घ्यावी. यासाठी नगरपालिका संपूर्ण निधी देण्यास तयार आहे. मात्र ३ ऱ्या टप्प्याचे काम सुरु करताना ही रक्कम लोकवर्गणीचा हिस्सा म्हणून समजण्यात यावी अशाप्रकारे प्रस्तावात विनंती केली व या कामाचे भूमीपूजन मंडळाचे उपाध्यक्ष व ग्रामीण राज्यमंत्री मा. नामदार पंडीतराव दौंड यांच्या शुभहस्ते दिनांक २९/१२/१९८८ रोजी झाले. ही योजना ४ ते ५ महिन्यात पूर्ण झाली. या योजनेमुळे वर नमुद केल्याप्रमाणे शहराच्या मध्यवर्ती भागात प्रेशरने पाणी पुरवठा उपलब्ध झाला. शहरवासीयांना शुध्द पाणी मिळावे म्हणून पाथरी तलावातील पाण्यासाठी स्थिरीकरण ऐवजी जलशुध्दीकरण करण्याची योजना राबवावी

असे नगरपालिकेने प्रस्तावाव्दारे ठरवून लोकवर्गणी मुख्य अभियंता भोजराज यांच्या सुचनेनूसार (१० टक्के) शासनाकडे भरली. सोलापूरच्या इ. एन. कार्यकारी अभियंत्यांनी नगरपालिकेस भेट देऊन पहाणी केली. आमदार श्री. दिलीप सोपलांच्या उपस्थितीत या प्रश्नावर चर्चा होऊन जलशुध्दीकरण केंद्र व उजनी प्रकल्पाचे टेंडर व निविदा एक महिन्यात काढण्यात आली. दरम्यानच्या काळातच मा. नामदार सुशिलकुमार शिंदे, आमदार दिलीप सोपल, नगरसेवक मठपती , सचिव पटवर्धन साहेब , मंडळाचे सदस्य यांनी उजनी प्रकल्पासंबंधी चर्चा करुन ४ वर्षात सदरची योजना पूर्ण करावी असे ठरले. नगरपालिकेने आठ हप्त्यात लोकवर्गणीची रक्कम भरली. ही लोकवर्गणी भरत असताना ४ वर्षात मंडळाने योजना पूर्ण न केल्यास नगरपालिकेने शेवटचा हप्ता भरू नये अशा सुचना देण्यात आल्या . या पाणी प्रश्नावर नगरपालिकेने आपल्या खाजगी पाणीपट्टीच्या दरात प्रस्ताव क्रमांक २०८ दिनांक १६ / ११ / ८८ व्दारे वाढ केली. वेळोवेळी विजेचे युनिटचे दर वाढत गेल्याने नगरपालिकेला या खात्यावर ५०,००,००० रुपयाचा तोटा सहन करावा लागला. याचे प्रामुख्याने कारण राज्य शासनाने महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकासाठी समान उपविधी असावेत म्हणून ४० उपविधीची पुस्तिका तयार केली. त्याप्रमाणे प्रत्येक नगरपालिकेने त्यांची आंमलबजावणी करावी असे सांगितले. या आदर्श उपविधीचा विचार करुन बार्शी नगरपालिकेने सन १९७६ च्या सुमारास उपविधी तयार केले. व त्या उपविधीनुसार शहरवासीयांना पाणीपट्टीचे दर लागू केले. याच उपविधीत परिशिष्ट - २ मधील टीपेमध्ये घरगुती प्रयोजनासाठी जे दर असतील त्या दराच्या दुप्पट रकमेपेक्षा जास्त दराने आकारणी करता येणार नाही अशी तरतूद आहे. याउलट अधिनियमातील व नियमातील तरतुदींचा विचार करता मंडळाने घरगुती व बिगर घरगुती वापराच्या प्रमाणात बदल केला. १ : २ प्रमाणाऐवजी १:३ , १:४ या प्रमाणात आकारणी करतात. तसेच मंडळाने निर्णय घेऊन पूर्व सुचना न देता अचानक दरवाढ केली जाते करारानुसार नगरपालिकेस ती रक्कम भरावी लागते. लोकप्रतिनिधींना

प्रचलीत दरात वाढ करण्यात लोकक्षोभास सामोरे जावे लागते. याबाबत मा. नगराध्यक्षा यांनी मा. नामदार बाळासाहेब जाधव यांना नगरपालिकेतर्फे निवेदन देवून याबद्दल तरतुदीचा फेरविचार करण्याची विनंती केली. तसेच राज्य शासनाकडे निवेदनाव्दारे याबाबतीत कायद्यातील असलेल्या उणीवा व त्यामुळे नगरपालिकेस सहन करावा लागणारा तोटा याचे विश्लेषण केले. इतकेच नव्हे तर पाणी पुरवठ्याची दरवाढ करीत असताना बिगर घरगुती प्रश्नावर ठरावाव्दारे उपविधीत दुरुस्ती करुन मंजूरीस्तव प्रकरण पाठविले असता उपविधी दुरुस्ती करणेची आवश्यकता नाही अशी उत्तरे शासनाकडून मिळाली आहेत. तथापि पुन्हा पुन्हा या मुद्यावर संबंधीत खात्याकडून मार्गदर्शन मिळाले ते समाधानकारक नाही. आज हा ही प्रश्न प्रलंबित आहे. या बाबीमध्ये बार्शी नगरपालिकेची स्पष्ट भूमीका आहे की ज्या ज्या वेळी मंडळाचे कडून दरवाढ होईल आणि ज्या ठिकाणी मंडळ स्वत: ज्या शहरात पाणीपुरवठा करते त्या शहरात कोणत्या दराने आकारणी करावी असा निर्णय घेतला जातो. व त्याप्रमाणे संबंधीत घरमालकाकडून बिलाची आकारणी केली जाते. याच पध्दतीने ज्या ठिकाणी नगरपालिकेकडे पाणी पुरवठ्याची वाटप व्यवस्था आहे त्याठिकाणी वरील पध्दतीप्रमाणेच दर आकारणी करण्याचे दंडक कायद्यात घालणे जरुरीचे आहे. असे केल्यास शासनाच्या ' ना नफा ना तोटा ' या धोरणानुसार नगरपालिकेला पाणी पुरवठा करता येईल. अन्यथा तोटा वाढत जावून त्याचा दुष्परिणाम अन्य विकासाच्या कामावर होईल अशी नगरपालिकेची स्पष्ट भूमिका आहे.

अभिवर्धन योजना जरी पूर्ण झाली तरी विद्युतदाब हा ४१० किलोवॅट ऐवजी ३०० ते ३५० मिळू लागल्याने मोटारी बंद होत गेल्या व त्याचा परिणाम या योजनेमुळे ७० लाख लिटरऐवजी ४२ लाख लिटर ऐवढेच पाणी मिळत गेले. ही बाब मा. नगराध्यक्षा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे मुख्य अभियंता श्री रामाराव यांच्या पुढे मांडून नगरपालिकेत मंडळ व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक

घेऊन चर्चा घडवून आणली. मोटारींचा विद्युत दाब वाढविण्यासाठी ३३ / ११ किलो. व्होल्ट चे वीज उपकेंद्र व एच टी लाईन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. उभय मंडळात सदरचा नियोजित खर्च १४. ७८ लाख रुपये कोणी सोसावा याबद्दल वाद निर्माण झाला. बार्शीकरांची पाण्याची निवड लक्षात घेऊन कलम ८१ ( ४) खाली श्री मठपती यांनी प्रस्ताव सादर करुन नगरपालिकेमध्ये चर्चा घडवून आणली. त्यानुसार चर्चा होऊन नगरपालिकेने शहरवासीयांच्या गरजा लक्षात घेंऊन बिलापोटी अनामत रक्कम भरण्याचे ठरविले व तशी नोटीस इ. एन. इ. मंडळास मुख्यधिकारी, नगरसेवक व मंडळाचे अधिक्षक अभियंता यांची संयुक्त बैठक बार्शी नगरपालिकेमध्ये झाली व हे काम युध्दपातळीवर करण्याचे ठरले. मार्चअखेर असल्याने निधीची उपलब्धता लक्षात घेवून इ. एन. ई. मंडळाने ४,००,००० रुपये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरले. काम पूर्ण होऊनही पैसे न भरल्याने वीज कनेक्शन मंडळाने देण्याचे नाकारले. त्याचवेळी तुळजापूर येथे मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांचा दौरा होता तेव्हा नगराध्यक्षांनी त्यांना भेटून वीज पुरवठा पुन्हा सुरु करण्याची मागणी केली, व पैसे वीज महामंडळाकडे ३ महिन्याच्या आत भरण्याचे कबूल केले.

## के. व्ही. विद्‌युत उपकेंद्र :

चांदणी प्रकल्पापासुन उपलब्ध होणारे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्यास विद्यूत पुरवठा कमी दाबाचा होत असल्याने बूस्टरपासून नवीन ३३ / ११ किलो व्होल्ट बूस्टरजवळ केंद्र उभा करुन विद्युत पुरवठ्याची लाईन ओढण्याचे प्राकलन रु. १४.७८ लाखाचे तयार करुन जानेवारी १९९० ते मार्च १९९० या कालावधीत पूर्ण करण्यात आलेले आहे. त्याचा तपशील व माहिती खालीलप्रमाणे आहे.


सन १९८९ - ९० मध्ये बूस्टर केंद्र व चांदणी धरणाजवळील इलेक्ट्रीक मोटर्सना वीज पुरवठा अत्यंत कमी दाबाने मिळू लागला. त्यामुळे चांदणी योजनेकडून मिळणाऱ्या

पाणी पुरवठ्यात लक्षणीय घट झाली. दररोज ४० लाख लिटर्स् पेक्षाही कमी पाणी पुरवठा मिळू लागला. याकरिता उपरोक्त दोन ठिकाणी वीज पुरवठा सुरळीत व योग्य दाबाने उपलब्ध होण्यासाठी बूस्टर केंद्राजवळ ३३ / ११ किला वँट चे वीज उपकेंद्र उभारणी व बूस्टर केंद्रापासूनचांदणी धरणापर्यंत नवीन लाईन टाकणे या कामास वीज मंडळाने प्रारंभ करुन हे काम त्यांनी युध्दपातळीवर पूर्ण केले. नवीन वीज उपकेंद्र दिनांक १३ / ४ / ९० रोजी कार्यान्वीत करण्यात आले . या उपकेंद्रामुळे तेथील पंपसेटना ४०० ते ४५० दाबाने वीज पुरवठा होऊ लागला आहे. त्यामुळे चांदणी योजनेकडून दररोज ६० ते ६२ लीटर्स् पाणी पुरवठा उपलब्ध होवू लागला.

बार्शी नगरपालिका पाणी पुरवठा विभागाचे उत्पन्न व खर्च दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे

**पाणी पुरवठा विभागाचे उत्पन्न व खर्च दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | उत्पन्न रुपये | खर्च |
|---|---|---|
| १९७० - ७१ | ६९, ३०४ | १,९०,३८३ |
| १९७१- ७२ | ६६,२७० | २,४२,८३७ |
| १९७२- ७३ | ८०,५१६ | ३,४३,१२० |
| १९७३- ७४ | ८३, ७६० | २,९५,७५७ |
| १९७४-७५ | ८५ ,११० | ४,९७,९२० |
| १९७५ - ७६ | १,०९,४१० | ५,३४,१६५ |
| १९७६ - ७७ | १,७७,५९१ | ९,८७,८१६ |
| १९७७ - ७८ | १,८२,२०५ | ९,९७,९१६ |
| १९७८ - ७९ | २,००,०५५ | ९,९८,६१९ |
| १९७९ - ८० | २,०२,०५५ | ९,८२,१०५ |
| १९८० - ८१ | २,०२,७५३ | १०,९०,०१२ |




बार्शी-कुर्डूवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना

| वर्ष | उत्पन्न रुपये | खर्च |
|---|---|---|
| १०८१ - ८२ | २,५९,४२४ | ५,८३,४१० |
| १९८२ - ८३ | २,६९,१८७ | १७,७४,७६६ |
| १९८३ - ८४ | ५,४५,०१८ | १३,८९,२७४ |
| १९८४ - ८५ | ५,७८,३५८ | १९,१३,८६६ |
| १९८५ - ८६ | ६,२७,०८१ | २०,६५,४३० |
| १९८६ - ८७ | ५,६५,६७८ | २९,१६,११९ |
| १९८७ - ८८ | ६,१५,००० | ३०,८४,२८३ |
| १९८८ -८९ | ८,६०,६१४ | ४३,१८,७०९ |
| १९८९ - ९० | १४,९४,४७८ | ४१,०५,५२८ |

**बार्शी कुर्डूवाडी शहरासाठी संयुक्त पाणी पुरवठा योजना - १९९० :**

बार्शी शहराची औद्‌योगिक गरज व माणसी पाणी पुरवठ्याचे प्रमाण (संभाव्य लोकवस्ती - १,४२,०००) इतकी धरल्यास व सध्याचे शहरातील पाणी पुरवठ्याचे प्रमाण (७० लिटर्स दर माणसी ) लक्षात घेतल्यास शहरातील पाणी पुरवठ्यात कायमस्वरुपी वाढ करण्याच्या दृष्टीने उजनी जलाशयातून पाणी उचलून ते बार्शी व कुर्डूवाडी शहरास दयावयाचे आणि या दोन्ही शहरांच्या पाणी पुरवठ्याचा यक्ष प्रश्न सोडवायचा म्हणून शासनाने १९९० मध्ये एक विस्तारीत संयुक्त पाणी पुरवठा योजना मंजूर केली. सदरच्या योजनेची रक्कम २३.६७ कोटी इतकी आहे. सदरच्या योजनेमध्ये खालील कामे अतर्भूत होती.

१. **उगमस्थान :**

मौजे कंधार तालुका करमाळा या गावानजीक पसरलेल्या उजनी धरणाच्या जलाशयात नं. ४१३ मध्ये ९ मीटर व्यासाची जॅकवेल व यंत्रगृह -

या यंत्रगृहामध्ये २७५ अश्वशक्तीचे व्हर्टिकल टरबाईन पंप बसवून ७११ मि.मि व्यासाच्या एम. एस. नलिकेव्दारे ताशी ११, २४,००० लिटर्स इतके पाणी उपसले जाते. ७११ एम.एस. पाईपलाईन २० कि.मी. लांबीची असून तेथून पुढे ८०० एम.एस. व्यासाचे प्रिस्ट्रेस्ड पाईप्स ११. ६ कि. मी. लांबीचे टाकण्यात आले आहेत. व तेथून पुढे ७०० मि.मि. व्यासाचे १.४ कि.मी. लांबीचे प्रिस्ट्रेस्ड पाईप्स टाकून कुर्डूवाडी शहरासाठीच्या जलशुध्दीकरण केंद्राजवळच बार्शी शहरासाठीही एक अशुध्द पाण्याचा हौद व पंपगृह बांधून तेथून पुढे १६० अश्वशक्तीच्या पंपाच्या सहाय्याने ते पाणी ३२ कि.मी. लांबीच्या व ७०० मि.मि. व्यासाच्या प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रीट पाईपव्दारे बार्शी येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यत आणले आहे. सदरचे पाणी १९ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्दीकरण करुन ते पाणी शुध्द पाण्याच्या हौदामधून सोडून ५० अश्वशक्तीच्या पंपाच्या सहाय्याने पंपीग करुन '७०० मि.मि. व्यासाच्या व २ कि.मी. लांबीच्या प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रिट पाईपाव्दारे ते पाणी ३५ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या जमिनीवरील हौदात सोडून पुढे अस्तित्वात असलेल्या जलवितरण नलिकामधून बार्शी शहरास पुरविले जाते.

सदरची योजना ४ वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण करण्याचे मंडळाचे अध्यक्ष व नगरविकासमंत्री मा. ना. सुशिलकुमार शिंदे यांच्या मंत्रालयातील दालनात दि. - ४ / ५ / १९९० रोजी आमदार दिलीप सोपल मंडळाचे सदस्य सचिव श्री. पटवर्धन, नगरसेवक अर्जुन बारबोले व चंद्रकांत मठपती यांनी ठरवले. व नगरपालिकेने आपली लोकवर्गणी वरील मुदतीत भरण्याचे ठरले.

या योजनेचा वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे.

( सर्व आकडे लाखात आहेत )

| नगरपरिषद | शासकीय अनुदान | लोकवर्गणी | कर्ज | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयुर्विमा | खुला बाजार | |
| बार्शी (ब वर्ग) | ७४४.४०(४०%) | १८६ . १० | ५७६. ९० | ३५३.६० | १८६१.०० |
| कुर्डूवाडी (क वर्ग) | २१२.५०(५०%) | ४२.५० | १७०. ०० | - | ४२५.०० |
| मध्य रेल्वेकडून कुर्डूवाडी स्टेशनसाठी पुरविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या हिश्यापोटी | | | | | ८१.०० |
| एकूण | ९५६.९० | २२८.६ | ७४६.९० | ३५३.६० | २३६७.०० |

**शासन निर्णय :**

बार्शी व कुर्डूवाडी या अनुक्रमे ‘ ब ’ व ‘ क’ वर्ग नगरपरिषदांच्या संयुक्त वाढीव पाणी पुरवठा योजनेचा निव्वळ खर्च रुपये २०. १३ कोटी ( वीस कोटी तेरा लाख ) आणि १७.५ टक्के आस्थापणा, अवजारे व संयंत्रे यासाठीचा खर्च धरुन ढोबळ खर्च रुपये २३. ६७ कोटी च्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाने तयार केलेल्या नकाशे व अंदाजपत्रक यांना खालील अटींवर प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१. वरील आकृतीबंधावरुन या योजनेसाठी एकूण रु. ९५६.९० लाख अनुदान देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. या योजनेस नगरपालिकेचे आर्थिक नुकसान न होईल तसेच योजना स्वावलंबी होईल त्यादृष्टिने आवश्यकतेनुसार नगरपालिकेने पाण्याच्या दरात वाढ केली पाहिजे. त्याचप्रमाणे योजनेवर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न यांचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवावा.

३. ही योजना पूर्ण झाल्यानंतर ती राबविण्यासाठी शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळणार नाही.

४. आर्थिक आकृतीबंधात बदल झाल्यास तो या योजनेला लागू होईल.

५. ही योजना नगरपालिकेची योजना असून योजना कार्यान्वित झाल्यानंतर नगरपालिका ती चालविण्यासाठी स्वत:च्या ताब्यात घेईल व पुढे चालविल.

६. नगरपालिकांनी लोकवर्गणीची रक्क्म नियमाप्रमाणे महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडे भरल्यानंतरच योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात यावी ही लोकवर्गणीची रक्कम वेळेवर भरण्यासंबंधीचे वेळापत्रक नगरपालिकांनी तयार करावे.

७. नगरपरिषदांनी त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावा

८. योजनेच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी वरीलप्रमाणे नगरपरिषदेचा ठराव महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाने प्राप्त करुन घ्यावेत.

पाटबंधारे विभागाने त्यांच्या क्रमांक सी. डी. ए. १२८५ / १२११ / २७५ / (सीएडी - डब्ल्यु यू ) दिनांक १५ / ९ / १९८९ च्या पत्रान्वये सदरहू योजनेस १२. ३९ दशलक्ष घनमीटर पाणी उजनी जलाशयात पुढील अटींना अधीन राहून आरक्षित करुन उचलण्यास परवानगी दिली असून यापूर्वी त्यांच्या समक्रमांकाच्या दिनांक २० / ८ / १९८६ च्या आदेशान्वये कुर्डूवाडी शहरासाठी आरक्षित केलेल्या २.९७ दशलक्ष घनमीटर पाण्याचा यात आंतर्भाव आहे.

१. जलाशयातील पाणी पातळी 'महत्तम रिक्तीकरण' पातळीच्या खाली दोन मिटर असतानाही पाणी उचलणे शक्य होईल असे जॅकवेलचे बांधकाम असावे.

२. पाणी माफक यंत्र बसवावे व अंदाजित बाष्पीभवन नोशासह घन माफक पध्दतीने पाणीपट्टी आकारण्यात येईल.

३. उजनी जलाशयातून पाणी उचलण्यापूर्वी बार्शी शहरासाठी चांदणी तलावातून पाणी उचलण्यापूर्वी सध्याची यंत्रणा बंद करण्यात यावी.

४. जलाशयातील पाणी दूषित होण्याची कोणतीही शक्यता असल्यास बार्शी व कुर्डूवाडी नगरपरिषद व महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळाने सदर बाब टाळण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.

३. वरील मंजूर केलेले अनुदान रोख द्यावयाचे नसून योजनेच्या कामाची जसजशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे योजनेवर प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर समायोजित करावयाचे आहे. अनुदान रोख द्यावयाचे नसून समायोजित करावयाचा आहे. म्हणून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाने उपयोजना प्रमाणपत्र दाखल करण्याची जरूरी नाही.

४. याबाबतचा खर्च २२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता राज्ययोजना ( ४१) नगरपरिषदेच्या ( स्थानिक संस्था ) पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदाने दांडेकर समितीच्या शिफारशीनुसार त्रुटी भरुन काढणे (२२१५०६९६ ) मागणी क्रमांक एफ - ५ या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा आणि त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागवावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सी-आर ६३९/व्यय-३, दिनांक ७ ऑक्टोबर १९८९ नुसार निगीमत करण्यात येत आहे.

## बार्शी नगरपालिका जमा आणि खर्च दर्शविणारा तक्ता

नगरपालिकेची सन १९८८ पासून एकूण जमा आणि खर्च दर्शविणारा तक्ता याचबरोबर नगरपालिकेच्या वतीने अंमलबजावणीत असणारे कर , दर आणि फी यासंबंधीची माहिती दर्शविणारा तक्ता याचबरोबर महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नगरपालिकेने स्विकृत केलेले उपविधी  यांची माहिती दर्शविणारे तक्ते सोबत जोडले आहे.

| सन | जमा | खर्च |
|---|---|---|
| १८८६ | २९,५८१ | ३७,०९० |
| १९०१ | ४४,४३० | ६६,१९९ |
| १९१२ | ६३,२३६ | २५,६५,७९६ |
| १९६५ - ६६ | २३,४५,२६६ | ६७,६५,८३६ |
| १९७७ - ७८ | ६८,०४,४५६ | २,८७,१५,७६४ |
| १९८४ - ८५ | २,७१,८४,९७६ | २,३९,२६,८९२ |
| १९८५ - ८६ | २,६८,४१,३७४ | २,१२,२९,०४८ |
| १९८६ - ८७ | २,३९,५३,७७९ | २,८१,५०,५३६ |
| १९८७ - ८८ | २,८२,७४,२०१ | ३,०९,२०,३४१ |
| १९८८ - ८९ | ३,०३,३०,७४४ | १,६६,७९,०७४ |
| १९८९- ९० | ३,७०,८८,७११ | -- |

## सन १९८९ - ९० वार्षिक लेख्याचा सारांश

| जमा रक्कमा | अर्थ संकल्पीय अंदाज र. रु | प्रत्यक्ष रक्कम रूपये |
|---|---|---|
| **अ. नगरपालिका कर व दर :** | | |
| संयुक्त मालमत्ता कर | २०,००,००० | १५,९९,९८४ |
| जकात | १,१५,००,००० | १,१७,४२,४७६ |
| करमणूक कर | ९०, ००० | १,००,२१० |
| जाहिरात कर | ६,५०० | ३,७९५ |
| वाहनावरील कर ( चाकपट्टी ) | ७,००० | ५,५१९ |
| वाहने आणि प्राणी यावरील पथकर | ४०,००० | ४३,७७४ |
| कुत्र्यावरील कर | १०० | १०० |
| पाण्यावरील विशेष कर | ११,००,००० | ९,५०,२७४ |
| मीटरव्दारे पाणी पुरवठा | ४,००,००० | ४,८७,९८८ |
| किरकोळ पाणी विक्री | ५०,००० | ५६,२१६ |
| विशेष स्वच्छता कर | ८५,००० | ८१,८२७ |
| विशेष शिक्षण कर | २,३०,००० | १,७२, ६३५ |
| कोंडवाडा दंड | १,५०० | ९८७ |
| कोंडवाडा चरिंदा | ५,००० | ४,८५० |
| रहदारी पास फी | १७,००० | १९,६९७ |
| करावरील व्याज | ३०,००० | ४३,९६३ |
| वखार भाडे | ३,००० | ३,३५८ |
| | १,५५,६५,१०० | १,५३,१७,६५३ |

## ब. विशेष अधिनियमा खालील वसूली

| | | |
|---|---|---|
| मोटार व्हेईकल ॲक्ट | १,६४६ | १,६४६ |
| वृक्ष उपकर | ३८,००० | ३३,८७२ |
| मुंबई दुकाने व संस्था नोंदणी अधि. | १,००,००० | १,१४,३०७ |
| भेसळ प्रतिबंधक अधि. फी. | २८,००० | २१,४६३ |
| बिगर शेतसारा | १५,००० | १२,०७१ |
| | १,८२,६४६ | १,८३,१६७ |

## क. नगरपालिकेची मालमत्ता व उपयोगितापासून उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| जागा भाडे (लीज फी ) | १,१०,००० | १,१४,६१७ |
| इमारत भाडे | २,२५,००० | ५६,६३१ |
| मटन मार्केट भाडे | १,५०० | ८८ |
| बीफ मार्केट भाडे | ६,००० | ४,७२० |
| भाजी मार्केट गाळा भाडे | ४४,००० | -- |
| हॉस्पीटल फी | ३५,००० | ३३,००० |
| प्रसुतीगृह फी | ८,००० | ८,०२५६ |
| आयुर्वेदिक दवाखाना फी | ३,५०० | ३,३५४ |
| भाजी मार्केट फी | १०,००० | १४,२७४ |
| मच्छि मार्केट फी | ६०० | ८०२ |
| सरपण मार्केट फी | ६,५०० | ७,४६५ |
| स्लॉटींग फी | २,००० | ५,३६८ |
| वि.नि. पदार्थ घरगुती वापराखेरीज | | |
| ठेवणे फी | ४,००० | १,७८४ |
| वि.नि.प्रयोजनासाठी जागा वापर फी | १५,००० | १६,२०१ |

| | | |
|---|---|---|
| वि.नि.पदार्थ साठविणे अनुज्ञाप्ती फी | १०० | |
| वि.नि.पदार्थ विशिष्ठ मर्यादेपर्यंत | | |
| साठविणे . | ८०० | ९५६ |
| खाजगी शुल्कबंद वखार अनुज्ञप्ती | ५०० | |
| प्रक्षेपण व तात्पुरता भोगवटा फ्री | १५,००० | १५,३०६ |
| हातगाडा परवाना फी | २,२०० | २,७२४ |
| इमारत परवाना फी | ७,००० | ६,३३० |
| नोटीस फी | ६००० | १७,४८६ |
| वारंट फी | ९००० | २७,४३७ |
| उपांग फी | २,००० | १,४७५ |
| सर्व्हेक्षकांना लायसेन्स फी | ३०० | २२५ |
| मृत जनावरे कातडे विक्री | १०० | |
| तबेले व गाळे इ. नियमन फी | ५०० | २४५ |
| न.पा.व. इतर कायद्यान्वये दंड | १०० | ५ |
| बकरे व जनावरे मटन विक्री लाय फी | २,००० | २,६२० |
| वॉटर मिटर भाडे | ९०० | ३०३ |
| गलिच्छ वस्ती जागा भाडे | १,००० | |
| मच्छि मार्केट गाळा भाडे | ३५० | १३० |
| | ५,१८,९५० | ३,४१,८०५ |

ड. अनुदाने व अंशदाने

| | | |
|---|---|---|
| नागरी कुटुंब कल्याण केंद्र अनुदान | ५४,४०० | |
| महागाई भत्ता अनुदान | ४२,५०,००० | ३२,८९,५४९ |
| रस्ता अनुदान | ४,०९,००० | ४,०८,६८५ |

| | | |
|---|---|---|
| कुष्ठरोग पगारावरील अनुदान | १,२०० | १,२०० |
| बिलशेती व जमिन महसूल अनुदान | ८५,००० | १,२२,५३६ |
| करमणूक कर अनुदान | ७,४६,७०० | ३,३९,९१८ |
| मुंबई पब्लिक अधिनियम | १०० | |
| मा. मॅजिस्ट्रेटकडील दंड | ३,००० | २,३७३ |
| जिल्हा नियोजन व विकास मंडळ | | |
| योजना अनुदान | १०,००,००० | ५,१३,००० |
| विकास योजना व नगर रचना | | |
| योजना अनुदान | १,२८,३०० | ३,४८,५०० |
| कमी किंमतीचे संडास अनुदान | ६,३०० | ६,३०० |
| हुतात्मा स्मारक अनुदान | २,६५० | २,६४३ |
| गलिच्छ वस्ती सुधारणा अनुदान | १,५०,००० | १,३२,८३२ |
| अल्पबचत गुंतवणूक प्राप्त अनुदान | ५,००० | |
| मुख्याधिकारी रजा वेतन अनुदान | ३,७५० | |
| नेत्रशिबीर अनुदान | २,००० | १,४८० |
| प्रा. शिक्षण मंडळ अनुदान | ९६,३४,३०० | ७९,८२,५७० |
| कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया बेडस् अनुदान | ६,००० | ६,००० |
| कमी खर्चाची स्वच्छता योजना अनुदान | ७,१७,००० | ५,१७,००० |
| परिविक्षाधीन मुख्याधिकारी | | |
| वेतना वरील अनुदान | १४, २०० | |
| नेहरु रोजगार योजना अनुदान | ५००,००० | ४,५४,६७५ |
| | १,७७,१८,९०० | १,४८,२८,२६१ |

इ. संकीर्ण :

| | | |
|---|---|---|
| गुंतवणूकीवरील व्याज | १०,५६,२०० | १०,७५,५२३ |
| नक्कल व शोधणावळ फी | १३,००० | १५,००८ |
| साक्षी भत्ता | ४०० | ४१६ |
| खत विक्री | १,८०,००० | १,५२,०५० |
| शेणचिपाड मक्ता | २०० | ८६० |
| जुने भांडार विक्री | ९०,००० | १,४५,१६४ |
| मतदार याद्या व इतर प्रकाशन विक्री | १४,००० | १५,२४८ |
| नळ दुरुस्ती व जुडाई | १५,००० | २७,५३६ |
| मासे विक्री | ५५,१२५ | ५५,१२५ |
| झाडे विक्री | १०० | |
| महाराष्ट्र शिक्षणकर वसूली रिबेट | ३३,६३५ | ३६,५३५ |
| रोजगार हमी योजना कर वसुली रिबेट | ४,९६० | २,४५९ |
| नगरपालिका ऑडीट वसूली | ५,००० | २२७ |
| इतर किरकोळ | १,००,००० | ११,०८८५४१ |
| विकास योजना कर्ज | १,००,००० | १,००,००० |
| वॉटर मिटर किंमत वसूल | १,००० | ५५० |
| खाजगी लोकांची कामे केल्याबददल | ३,००० | १,३५६ |
| न. पा. शिक्षण मंडळ ऑडीट वसूली | ५,००० | |
| इतर दुरुस्ती | १,००० | |
| दुर्बल घटक कल्याण निधी | ८,७६,८६४ | ८,५६,८६४ |
| जलसंडास निधी | १,०५,७९४ | १,५९,७३८ |
| रस्ता निधी | ४,०९,००८ | ४,३९,००८ |

| | | |
|---|---|---|
| वृक्ष प्राधिकरण निधी | ७७,१०० | |
| खाजगी शौचकूप रुपांतर यो. कर्ज . | ९,५७,००० | |
| खाजगी शाळा न. पा. हिस्सावसुल | २,१९,०३६ | |
| | ४२,५६,३२२ | ४२,५९,३०८ |
| एकूण अ ते ई :- | ३,८२,४१,९१८ | ३,४३,३०,१९४ |

**फ. डिपॉझिटस अॅण्ड अॅडव्हान्सेस :**

| | | |
|---|---|---|
| वॉटर डिपॉझीट | १,७५,००० | ६७,३४८ |
| कॉन्ट्रॅक्टर डिपॉझीट | ३,००,००० | ३,७१,८१५ |
| इतर डिपॉझीट | ४,००,००० | १,१८,४०० |
| इलेकशन डिपॉझीट | ५०,००० | |
| कोंडवाडा डिपॉझीट | ५,००० | २५७ |
| बेटरमेंट चार्जेस डिपॉझीट | १०,००० | |
| जकात डिपॉझीट | १०,००० | |
| भांडार अॅडव्हान्स | ७,००,००० | १,७४,०५१ |
| कॉन्ट्रॅक्टर अॅडव्हान्स | २,००,००० | ४,१८,४३१ |
| कर्मचारी अॅडव्हान्स | २,००,००० | १,४९,५१४ |
| इतर अॅडव्हान्स | १,००,००० | १,३५० |
| जकात अनामत | २०,००० | १७,२०५ |
| कोंडवाडा अनामत | २,००० | १,७८५ |
| महाराष्ट्र एज्युकेशन सेस | ४,६०,००० | ४,६०,०३४ |
| रोजगार हमी योजना सेस | ६१,००० | ६८,३७५ |

| | | |
|---|---|---|
| सिमेंटची किंमत वसूल | ९,१५,००० | ७,०७,६३५ |
| | ३६,०८,००० | २७,५८,५१८ |
| एकूण जमा अ ते फ | | ३,७०,८८,७१२ |
| प्रारंभिक शिल्लक ( दि. १ एप्रिल १९८९ ) | | ९१,५०,६६२ |
| प्रारंभिक शिल्लकेसह एकूण जमा र. रु. | | ४,६२,३९,३७४ |

| खर्च रक्कम | अर्थ संकल्पीय अंदाज र.रु. | प्रत्यक्ष खर्च रक्कम रूपये |
|---|---|---|
| **अ. सामान्य प्रशासन व करवसुली खर्च** | | |
| समान्य प्रशासन | ७,८८,२०० | ७,३४,५५० |
| लेखा परिक्षण विभाग | ५८,००० | ४६,९६३ |
| लेखा विभाग | १,३५,००० | १,२०,८३२ |
| करवसुली खाते | ३,७८,५०० | ३,६१,७११ |
| जकात टोल | १७,००,८०० | १५,८१,६२० |
| परतावे | १९,००० | १३,९३० |
| निवृत्तीवेतन व उपदाने | ७,८२,००० | ७,४२,८४० |
| | ३८,६१,५०० | ३६,०२,४५४ |
| **ब. सार्वजनिक सुरक्षितता :** | | |
| अग्निशमन | २,९३,५०० | २,४९,५२९ |
| रस्त्यावरील दिवाबत्ती | ७,४९,३०० | ४,६१,२४१ |
| इतर ( मोकाट जनावरे , पिसाळलेली कुत्री व अन्य उपद्रवी प्राणी किटक यांचा बंदोबस्त ) | २,००० | |
| | १०,४५,४०० | ७,१०,७७० |

**क. आरोग्य व सोय**

| | | |
|---|---|---|
| क्लोरिनेशन | ४,१०,६०० | २,९०,९१२ |
| पाणी पुरवठा | ५०,३५,५०० | ३८,८६,५७३ |
| साफसफाई व सोय - सुपरवायझिंग | ४,२५,६०० | ३,९४,९६९ |
| रस्ते सफाई | १७,५०,८०० | १६,४१,०६६ |
| कॉन्झर्व्हन्सी | ११,२३,६०० | ९,८२,१५२ |
| भेसळीची मनाई | ५४,७५० | ४७,४३३ |
| रुग्णालये - दवाखाने म्यु. पल. हॉस्पी. | ५,२१,८०० | ४,२८,५६२ |
| नागरी कुटूंब कल्याण केंद्र | ३१,९०० | २५,२७५ |
| प्रसूती गृह | २,८०,१०० | २,४१,२३४ |
| आयुर्वेदिक दवाखाना | २,०३,४०० | १,६०,७२३ |
| कुष्ठरोग निवारणे | ५०,५५० | ४७,०७९ |
| जन्म - मुत्यू नोंदणी | २९,००० | २६,०४४ |
| मुंबई दुकाने व संस्था नोंदणी अधि. | ७४,२०० | ६८,३७० |
| इतर साथीचे रोग निवारणे - प्लेग | १,०८,४०० | ९३,९२१ |
| ॲन्टी मलेरिया मेझर्स | २६,८०० | १५,८८६ |
| स्माशानभूमी | | २०,०००९,६३७ |
| बाजारपेठा व कत्तलखाने - बाजारपेठा | ८०,१०० | २९,२४१ |
| कत्तलखाने | ११,२५० | १,२७२ |
| धोकादायक - त्रासदायक | २९,९०० | २६,६६७ |
| कोंडवाडा | ७,८०० | ८०९ |
| सार्वजनिक उद्याने | २,१०,९०० | १,७८,२२१ |
| धर्मशाळा - बंगले | ४४,००० | ४१,३६१ |

| | | |
|---|---|---|
| सार्वजनिक बांधकाम | ४,३८,५०० | ३,६९,१३२ |
| इमारत करंट रिपेर | ६३००० | ४०,५३४ |
| रस्ते व रोड इम्प्रूव्हमेंट वर्क्स | ३,५८,००० | ३,०४,४१३ |
| ड्रेनेज व गटारे | १,३५,००० | ९१,३७,७०९ |
| | १,१६,२४,४५० | ९५,३७,७०९ |

## ड. शिक्षण - प्राथमिक शिक्षण

| | | |
|---|---|---|
| शिक्षण मंडळास म्यु. पल. अंशदान | ७,५०,००० | ६,९८,६१९ |
| प्राथमिक शिक्षण मंडळ अनुदान | ९६,३४,३०० | ७९,८२,५७० |
| प्राथमिक शाळा दुरुस्ती | १५,००० | १३,००० |
| गरिब व मागासवींय विद्यार्थ्यांना | | |
| पाट्या व कपडे | ५५,००० | ५४,७४१ |
| इ. अंशदाने | १,०४,५४,३०० | ८७,४९,०३५ |
| मूळ आणि भांडवली बांधकामासाठी | १,३६,९०,२५० | ८७,८९,८८२ |
| भांडवली लेख्यामध्ये हस्तांतरण | | |
| वेड्यास पोटगी | ८०० | |
| संस्थांना अनुदाने | २,६५,५०० | २,४०,५०० |
| अखिल भारतीय स्था. स्वराज्य | | |
| संस्था वर्गणी | ३०० | |
| बालवाडी ताई - दाई अंशदान | ४२,००० | ३९,९०० |
| शिबीरे व नॅशनल हेल्थ प्रोग्रॅम | १,००,००० | ६,४५७ |
| | १,४०,९८,८५० | ९०,७६,७३९ |

**फ. संकीर्ण :**

| | | |
|---|---|---|
| कर्ज परतफेड | २,२०,००० | ३,०४,४१२ |
| कर्जावरील व्याज | ५,००,००० | ५,९०,८४८ |
| कर्जावरील गॅरन्टी फी | १५,००० | ११८ |
| कर्ज निवारण निधीस देणे रक्कम | १,००,००० | १,००,००० |
| घसारा निधी | ५१,००० | ५०,७४८ |
| दुर्बल घटक कल्याणकारी निधी | १०,००० | १०,००० |
| वेतन राखीव निधी | १,००,००० | १,००,००० |
| वृक्ष प्राधिकरण निधी | ४०,००० | ४०,००० |
| रस्ता निधी | ५०,००० | ५०,००० |
| पाणी पुरवठा निधी | ३,००,००० | ३,००,००० |
| निवडणूक खर्च | ४०,००० | ४०,५०२ |
| दावे - खटले संबंधी खर्च | ४५,००० | ३२,००० |
| वृक्षारोपण व जोपासना | ९०,००० | ८७,७०० |
| प्रवास भत्ता | ३६,००० | ३०,६७६ |
| जलसंडास निधी | ४५,००० | ४५,००० |
| कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण | ३,००० | १८५ |
| अल्पबचत गुंतवणूक प्रोत्सा. निधी | २,००० | |
| शेतसारा | ८,००० | ५,८१२ |
| दिन व उत्सव साजरा करणे | २,००० | ७११ |
| बेवारस मट्टी खर्च | १,००० | |
| खाजगी लोकांची कामे करणे | ३५,००० | ३६,९७० |
| न.पा.कर्मचारी कल्याण संवर्धन | | |

| | | |
|---|---|---|
| सांस्कृतिक कार्यक्रम व जिल्हा स्पर्धा | ४०,००० | २७,१७१ |
| शतकोत्तर रौप्य महोत्सव साजरा करणे | ३५,००० | १०,६३८ |
| जनगणना | २०,००० | ३९५ |
| | १७,८८,००० | १८,६८,४११ |
| एकूण अ ते फ | ४,२८,७२,५०० | ३,३५,४५,११८ |

## ग. डिपॉडिटस् ॲण्ड ॲहव्हान्सेस

| | | |
|---|---|---|
| वॉटर डिपॉझीट | १,७५,००० | ५९,१६० |
| कॉन्टॅक्टर डिपॉझीट | ३,००,००० | ३,८५,२३७ |
| इतर डिपॉझीट | ४,००,००० | १०,१२,०६५ |
| इलेक्शन डिपॉझीट | ५०,००० | |
| कोंडवाडा डिपॉझीट | ५,००० | ४,६१० |
| बेंटरमेंट चार्जे डिपॉझिट्स | १०,००० | |
| जकात डिपॉझीट | १०,००० | ७६८ |
| भांडार ॲडव्हान्स् | ७,००,००० | ८८,२९२ |
| कॉन्ट्रॅक्टर ॲडव्हान्स | २,००,००० | |
| कर्मचारी ॲडव्हान्स | २,००,००० | १,२८,००४ |
| इतर ॲडव्हान्स | १,००,००० | ३२०६ |
| जकात अनामत | २०,००० | ९००९ |
| कोंडवाडा अनामत | २,००० | २,२५३ |
| महाराष्ट्र एज्युकेशन सेस | ४,६०,००० | ४,६०,०३४ |
| रोजगार हमी योजना सेस | ६१,००० | ६८,३७५ |

| | | |
|---|---|---|
| सिमेंट खरेदी | ९,१५,००० | ९,१२,२४३ |
| | ३६,०८,००० | ३१,३३,९५६ |
| एकूण खर्च अ ते ग.र.रु | | ३,६६,७९,०७४ |
| अखेरची शिल्लक ( दि. ३१.मार्च १९९०) | | ९५,६०,३०० |
| एकूण र. रु. | | ४,६२,३९,३७४ |

**अखेरच्या शिल्लकेचा तपशील**

| | |
|---|---|
| बँक चालूं खाते | ८,३७,०८६ |
| बँक बचत खाते | १६,८८,२४६ |
| बँक व पोष्टातील ठेव | ६६,३५,१४६ |
| हातातील रोख शिल्लक | ३,९९,८२२ |
| एकूण र.रु. | ९५,६०,३०० |